22 OCT 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय विद्यापीठ महासंघ (ए.आय.यु.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने तिसऱ्या राष्ट्रीय आंतर–विद्यापीठ कव्वाली स्पर्धेचे आयोजन केले आहे. या दोन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन २२ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात ए.आय.यु.चे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हीड यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. या स्पर्धेत देशभरातून आठ संघांनी नावनोंदणी केली आहे. २३ रोजी सायंकाळी ४ वाजता या स्पर्धेचा समारोप होईल.

कव्वाली स्पर्धेचे समन्वयक तथा विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या आठ संघांपैकी चार संघ महाराष्ट्रातील असून हरियाणा, पंजाब, राजस्थान व मध्य प्रदेश या राज्यांमधून प्रत्येकी एक संघ सहभागी होणार आहे. स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे २५ हजार रुपये रोख, २० हजार रुपये रोख व १५ हजार रुपये रोख आणि चषक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या आयोजनासाठी विद्यापीठ स्तरावर विविध समित्यांची निर्मिती केली आहे. या समित्यांना संघ व त्यांचे व्यवस्थापक, परीक्षक यांच्या निवासाची व्यवस्था विद्यार्थी भवन, पाच बंगला आणि विद्यापीठ अतिथीगृह येथे करण्यात आली आहे. चहापान व भोजनाची व्यवस्था लोककला केंद्रात केली आहे. तरी राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही डॉ. गुरव यांनी केले आहे.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती**

यावेळी प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इनोव्हेशन व इन्क्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर.के. कामत, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव, ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. रसूल कोरबू, डॉ. प्रकाश कुंभार होते.

22 OCT 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK youth festival to start on Oct 26

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The district level youth festival of colleges affiliated to Shivaji University Kolhapur (SUK) will commence from Satara district on October 26. The event will be held at DP Bhosale College, Koregaon, in Satara.

The festival was suspended earlier as teachers went on strike last month. It was supposed to be inaugurated on September 29.

SUK student welfare officer RV Gurav told TOI that students from over 200 colleges across the Sangli, Satara and Kolhapur districts will participate in the festival, which is meant to foster an interest in extra-curricular activities. There will be events in over 20 different categories.

Students will take part in folk and classical dances, classical singing, street plays, one act plays, debates, group songs and folk orchestra events. Officials said about 2,000 students participated in the festival last year. An even better response is expected this year.

Events are scheduled to be held at Kolhapur district's Mahavir College on October 27; on October 29, Sangli will host the youth festival at Shrimant Babasaheb Deshmukh College. After the district level rounds, winners will advance to the central youth festival to be held at Willingdon College in Sangli from October 31 to November 2.

Officials said winners of the central youth festival events will represent Shivaji University at the inter-university youth festival 'Indradhanush' later in the month of November. "A team of 40 student-winners in their respective categories in preceding rounds will be representing the SUK team at the inter-university festival," the official said.

22 OCT 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Alumni played vital role in devpt of institution, says Shivaji University VC

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The alumni association of Shivaji University, Kolhapur (SUK) organized its first alumni meet on Sunday. Over 250 alumni attended the event.

The vice-chancellor (VC) of the varsity Devanand Shinde said that its alumni have played an important role in SUK's overall development so far, while speaking at the event. "During my tenure, I have visited several countries on official tour, wherein I could always witness past students from SUK. Whether it is research or any other responsibility, our students are making sure that they are at the top in whatever they are offered," Shinde said.

DT Shirke, the pro-VC for SUK said that they are planning to offer guidance to the present students from the alumni of respective courses, so that these students also get exposure to what lies ahead and how to prepare for the same.

TOI



SUK VC Devanand Shinde addresses alumni on Saturday

## CAMPUS BUZZ

### National Qawwali Competition today

The third All India Inter-University National Qawwali Competition will be inaugurated at the Shivaji University, Kolhapur (SUK) on Monday.

Over eight teams, from across the country will participate in the two-day event. According to the varsity officials, all the preparations for the competition have been completed and the varsity is all set to host the event.

"Two teams, one from Punjab University and one from Aurangabad, backed out due to semester examinations," a varsity official said.

### Online applications invited for SSC exam

The Maharashtra state board of secondary and higher secondary education has invited the online applications forms for the Secondary School Certificate (SSC) exam till November 5. Applicants can also submit the form till November 17, with a late, a circular stated.

लोकमत

सारांश

## विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा

कोल्हापूर : भारतीय विद्यापीठ महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठातर्फे तिसरी राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धा सोमवारी (दि. २२) आणि मंगळवारी (दि. २३) विद्यापीठात होणार आहे. या स्पर्धेत देशातील आठ संघ सहभागी होणार आहेत, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि या स्पर्धेचे समन्वयक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली. उद्‌घाटन सोमवारी सकाळी साडेदहा वाजता वि. स. खांडेकर भाषा भवनच्या सभागृहात ए. आय. यू.चे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हिड यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

लोकमत

# 'पिंकथॉन वूमन रन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अडीशेहून अधिक महिला : कोल्हापूर ग्रुपचा वर्धापनदिन; तीन टप्प्यांत स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अभिनेता व फिटनेस गुरू मिलिंद सोमण यांनी दोन वर्षांपूर्वी 'पिंकथॉन ग्रुप'ची स्थापना केली. हा ग्रुप महिलांच्या आरोग्यासाठी देशभर कार्यरत आहे. त्याच्या वर्धापनदिनानिमित्त 'पिंकथॉन कोल्हापूर चॅप्टर'तर्फे रविवारी सकाळी शिवाजी विद्यापीठ परिसरात आयोजित केलेल्या 'पिंकथॉन वूमेन रन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यात २५० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवत स्पर्धा पूर्ण केली.



**कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ परिसरात रविवारी सकाळी पिंकथॉन कोल्हापूर चॅप्टरतर्फे आयोजित केलेल्या वूमन रनच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, विश्वविजय खानविलकर, आदी मान्यवर उपस्थित होते.**

या स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते झाले. प्रत्येकाने तंदुरुस्त असणे गरजेचे बनले आहे. त्यासाठी योगा, पोहणे, धावणे या क्रीडाप्रकारांसह संतुलित आहार घेणे गरजेचे आहे. यासाठी आयर्नमॅन मिलिंद सोमण, अजित पाठक, वैष्णवी नायक यांनी पिंकथॉन या नावाने महिलांसाठी ग्रुप बनविला. या ग्रुपच्या वतीने देशातील महिलांसाठी धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले जाते. रविवारी सकाळी शिवाजी विद्यापीठ परिसरातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याजवळ स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यानुसार दोन, तीन व पाच किलोमीटर अशा विविध टप्प्यांत ही स्पर्धा घेण्यात आली. अडीचशेहून अधिक महिला स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता.

यावेळी मधुरिमाराजे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, विश्वविजय खानविलकर, सागर लालवाणी, केदार हसबनीस, सुरेश चेचर, दीपक पाटील, अक्षय नागवेकर, शीतल संघवी, आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेसाठी आरती संघवी, गीता लालवाणी, सुमित्रा खानविलकर, वैशाली संघवी, मंजिरी हसबनीस, रूपाली नांगरे-पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थिनींना मोफत प्रवास पास

Anuradha.kadam
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT



**सव्वा लाख विद्यार्थिनींना होणार लाभ**

'बारावीनंतर मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण गंभीर आहे. यामागील अनेक कारणांमध्ये कॉलेजला जाण्यासाठी रोजचा प्रवास खर्च नको म्हणून कुटुंबातून मुलींच्या शिक्षणाला वाव दिला जात नाही हे वास्तव आहे. त्यामुळेच विद्यार्थिनींना विद्यार्थी सवलतीपोटी दिला जाणारा बस किंवा एसटी पास विद्यापीठाच्यावतीने देण्याची जबाबदारी घेण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थिनींवर शिक्षणासाठी होणाऱ्या आर्थिक खर्चाचा भार कुटुंबावर पडणार नाही व मुली कॉलेजला नियमित येऊ शकतील.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्यावतीने महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणाऱ्या सव्वा लाख विद्यार्थिनींना घरापासून कॉलेजपर्यंत येण्यासाठी मोफत प्रवास पास उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थिनींच्या दरमहा प्रवास खर्चानुसार या पासची सुविधा देण्यात येणार असून त्यासाठी विद्यापीठ प्रशासन स्वनिधीतून तरतूद करणार आहे. पहिल्या टप्प्यात यासाठी एक हजार विद्यार्थिनींची निवड करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या एकूण सरासरी तीन लाख विद्यार्थ्यांपैकी विद्यार्थिनींची संख्या सव्वा लाखाच्या घरात आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारितील जवळपास २८३ कॉलेजपैकी अनेक कॉलेज ग्रामीण भागापासून किमान दहा ते वीस किलोमीटर अंतरावरील तालुक्याच्या गावी आहेत. सव्वा लाख मुलींपैकी अनेक मुली नियमित कॉलेजला येत नाहीत. तर अद्यापही अनेक मुलींनी प्रवासाचा वाढता आर्थिक ताण नको म्हणून बारावीनंतर कॉलेजला प्रवेश घेतलेला नाही. विद्यापीठ प्रशासनाने कॉलेजमधील मुलींच्या संख्येबाबत तसेच उपस्थितीबाबत पाहणी केली. या पाहणीमध्ये रोजचा प्रवासखर्च विद्यार्थी सवलतीच्या दरात असूनही काही विद्यार्थिनींना आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींना मोफत पास उपलब्ध करून देण्याची संकल्पना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मांडली होती.

शहरातील काही भाग वगळता जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गावांमधील मुली उच्चशिक्षण घेत नसल्याचे चित्र आहे. गावात कॉलेज नसेल तर त्यासाठी तालुक्यापर्यंत रोजचा प्रवास करणे काही कुटुंबातील मुलींना आर्थिकदृष्ट्या शक्य नसल्याचेही दिसून येत आहे. शहरातील उपनगरातूनही मुली प्रवासाचा खर्च नको म्हणून कॉलेजला येण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींनी मासिक प्रवास खर्चाचा तपशील दिल्यास त्यांना पाससाठी विद्यापीठातर्फे आर्थिक मदत केली जाणार आहे.

पहिल्या टप्प्यात एक हजार विद्यार्थिनींची निवड या योजनेतील लाभार्थी म्हणून केली जाणार आहे. यामध्ये गावात कॉलेज नसल्यामुळे तालुक्याच्या गावी कॉलेजसाठी यावे लागते अशा विद्यार्थिनींपासून पास वितरण प्रक्रियेला सुरूवात होणार आहे. सध्या विद्यापीठातर्फे स्वनिधीतून या योजनेसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे.

# पिंकॅथॉनमध्ये धावल्या महिला, मुले

कोल्हापूर टाइम्स टीम

'घरातील महिला तंदुरुस्त तर कुटुंब तंदुरुस्त' असा संदेश देत शेकडो महिला व लहान मुले रविवारी सकाळी 'पिंकॅथॉन'च्यावतीने आयोजित केलेल्या रॅलीमध्ये धावले. शिवाजी विद्यापीठाच्या आवारात हा उपक्रम राबवण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

## विद्यापीठाच्या आवारातील उपक्रमाला प्रतिसाद

मॉडेल व फिटनेस गुरु असलेल्या मिलिंद सोमण यांनी दोन वर्षापूर्वी 'पिंकॅथॉन ग्रुप' ची स्थापना केली आहे. देशभरातील महिला व लहान मुलांच्या फिटनेससाठी हा ग्रुप काम करत आहे. रविवारी (२१ ऑक्टोबर) ग्रुपचा वर्धापनदिन असल्याने त्यानिमित्ताने शहरातील सदस्यांच्यावतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या आवारातच दोन, तीन व पाच किलोमीटरचे ट्रॅक ठरवण्यात आले होते. या रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी सकाळी सहा वाजता मोठ्या उत्साहाने महिला, लहान मुले उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे व नांगरे-पाटील यांनी मार्गदर्शन केले. सध्याच्या धावपळीच्या जगात महिलांनी स्वतःच्या फिटनेससाठी वेळ काढण्याची आवश्यकता आहे. घरातील महिला तंदुरुस्त असेल तर कुटुंबही तंदुरुस्त राहते, असे सांगितले.

रॅलीचे उद्घाटन झाल्यानंतर सहभागी झालेल्या सर्व महिला व लहान मुलांनी पाच किलोमीटरचा ट्रॅक पुर्ण केला. या रॅलीतून स्वतःच्या प्रकृतीसाठी वेळ काढण्याची आवश्यकता आहे, हा संदेश घेऊन महिला गेल्या. या उपक्रमाचे आयोजन सदस्या आरती संघवी, रुपाली नांगरे-पाटील, गीता लालवाणी, सुमित्रा खानविलकर, वैशाली संघवी, मंजिरी हसबसनीस यांनी केले.



पिंकॅथॉन ग्रुपच्यावतीने आयोजित रॅलीला मोठा प्रतिसाद मिळाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यावेळी उपस्थित होते.

# मास कम्युनिकेशन विभागात उद्या आजी-माजी विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागामध्ये मंगळवारी (दि. २३) मास कम्युनिकेशनच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. विभागास पन्नास वर्षे पूर्ण होत असून, सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विभागाच्या वतीने हा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या आय. क्यू. ए. सी.चे संचालक डॉ. आर. के. कामत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात विभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. नीशा मुडे-पवार यांनी केले आहे.

पुढारी

# पिंकॅथॉन रनिंग स्पर्धा उत्साहात

## शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर स्पर्धा संपन्न : २०० स्पर्धकांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अल्ट्रा मॅरेथॉन रनच, आर्यन मॅन मिलिंद सोमण, अजित पाठक, वैष्णवी नायक यांच्या महिला ग्रुपच्या वतीने 'पिंकॅथॉन डे'चे औचित्य साधून धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर झाली. यामध्ये २०० स्पर्धक सहभागी झाले होते. विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, मधुरिमाराजे छत्रपती यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.



**कोल्हापूर : पिंकॅथॉन डे निमित्त महिला ग्रुपच्या वतीने आयोजित केलेल्या स्पर्धेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विश्वास नांगरे-पाटील, विश्वविजय खानविलकर आदी. (छाया : तय्यब अली)**

पिंकॅथॉन या नावाचा महिलांचा ग्रुप असून त्यांच्या वतीने देशातील महिलांसाठी धावण्याच्या स्पर्धाचे आयोजन केले जाते. २१ ऑक्टोबर या दिवशी 'पिंकॅथॉन डे'चे औचित्य साधून कोल्हापूर पिंकॅथॉन रनिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. गेली दोन महिने महिला या स्पर्धेची तयारी करीत होत्या. स्पर्धा दोन, तीन आणि पाच किलोमीटर अशा विविध टप्प्यांत मोठ्या उत्साहात झाल्या.

यावेळी बोलताना पोलिस महानिरीक्षक नांगरे-पाटील म्हणाले, महिला तंदुरूस्त असेल तर कुटुंब तंदुरूस्त राहते. त्यामुळे अशा स्पर्धांचे आयोजन ही काळाची गरज आहे, असे सांगितले तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, महिलांच्या अशा उपक्रमांना शिवाजी विद्यापीठाचे पाठबळ राहिल, असे सांगितले. यावेळी सुमित्रा खानविलकर, वैशाली संघवी, रूपाली नांगरे-पाटील, गीता लालवाणी, मंजिरी हसबनीस, शीतलकुमार संघवी, विश्वविजय खानविलकर, सागर लालवाणी, केदार हसबनीस, सुरेश चेचर, दीपक पाटील, अक्षय नागवेकर, शीतल संघवी यांच्यासह संयोजक व स्पर्धक उपस्थित होते.



**कोल्हापूर : पिंकथॉनतर्फे आयोजित वुमन्स रनमध्ये सहभागी झालेल्या महिला.** (छाया एस. अली)

# पिंकथॉनमध्ये २५० महिलांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठामध्ये रविवारी पहाटे सहा वाजता 'पिंकथॉन वुमन रन' पार पडली. यामध्ये २५० महिलांनी सहभाग नोंदविला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अणि विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते या रनचे उद्घाटन करण्यात आले.

अभिनेते आणि फिटनेस गुरू मिलिंद सोमण यांनी दोन वर्षांपर्वी पिंकथॉन ग्रुपची स्थापना केली. महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी हा ग्रुप देशभर काम करतो. गेल्या २ वर्षांत देशभरातील १५० शहरांमध्ये या ग्रुपच्या शाखा कार्यरत झाल्या आहेत, तर कोल्हापूरमध्ये गेल्या तीन महिन्यांपासून 'पिंकथॉन'ची शाखा सुरू आहे. कोल्हापूर शाखेतर्फे २१ ऑक्टोबर हा पिंकथॉन दिन म्हणून साजरा करण्यासाठी वुमन रनचे आयोजन करण्यात आले होते. गुलाबी थंडीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या रम्य वातावरणामध्ये वुमन्स रनला सुरुवात झाली. यामध्ये महिलांसह त्यांची मुले आणि कुटुंबीय सहभागी झाले होते. २, ३ आणि ५ किलोमीटरचा ट्रॅक यावेळी बनविण्यात आला होता.

मधुरिमाराजे छत्रपती, विश्वविजय खानविलकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर यांच्यासह प्रमुख मान्यवर उपस्थित होते. आरती संघवी, गीता लालवाणी, सुमित्रा खानविलकर, वैशाली संगवी, मंजिरी हसबनीस आणि रूपाली नांगरे-पाटील यांनी रनचे आयोजन केले होते.

# विद्यापीठात २६ नोव्हेंबरपासून घुमणार कबड्डीचा आवाज

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
यावर्षीच्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डीच्या पुरुषांच्या स्पर्धेचे यजमानपद शिवाजी विद्यापीठाकडे आहे. दि. २६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीमध्ये ही स्पर्धा होणार असून, स्पर्धा सुरळीत पार पाडण्यासाठी तब्बल १७ समित्यांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठात कबड्डीचा आवाज घुमणार आहे.

शिवाजी विद्यापीठात या शैक्षणिक वर्षात अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये सोमवारपासून राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा, तर नोव्हेंबर महिन्यात २६ तारखेपासून कबड्डी स्पर्धा सुरू होणार आहे. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ



कबड्डी स्पर्धेची जय्यत तयारी विद्यापीठातर्फे सुरू आहे. या स्पर्धेच्या तयारसाठी प्रोटेस्ट समिती, टेक्निकल समिती, मैदान समिती, भाग्य पत्रिका, निवास समिती, वाहतूक समिती, लेखा समिती, खरेदी समिती, स्वागत समिती, प्रसिद्धी समिती, प्रथमोपचार समिती, पात्रता समिती, निधी संकलन समिती, सूत्रसंचालन समिती, सुरक्षा समिती, निकाल समिती, उद्‌घाटन व सांगता समारंभ समिती अशा तब्बल १७ समित्यांची स्थापना करण्यात येणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यामधील प्रोटेस्ट समितीचे अध्यक्ष आहेत. स्पर्धेची तांत्रिक बाजू भक्कम करण्यासाठी कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनची मदत घेण्यात येणार आहे. त्यामध्ये संभाजी पाटील, डॉ. बी. एन. उलपे, गौतम पाटील, अण्णासाहेब पाटील, बी. एच. पाटील, उमा भेंडिगिरी, अजित पाटील, उदय चव्हाण आणि प्रा. शेखर शहा यांचा समावेश आहे.



या स्पर्धेमध्ये विविध विद्यापीठाच्या कबड्डी संघांमध्ये एकूण ६७ सामने होणार आहेत. स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी पावणे नऊ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये मैदानाची तयारी, मंडप उभारणी, फोटोग्राफी, निमंत्रण पत्रिका छपाई, अल्पोपाहार, स्वागत समारंभ, विद्युत व्यवस्था तसेच टी शर्ट आणि कॅपसाठी अशा विविध बाबीसाठी ८ लाख ७५ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या स्पर्धेमुळे दर्जेदार कबड्डी खेळ पाहण्याची संधी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसोबतच करवीरवासीयांना मिळणार आहे, तर या स्पर्धेचे नेटके नियोजन करून भविष्यात अशा आणखी स्पर्धांचे यजमानपद घेण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा प्रयत्न आहे.

### विद्यापीठात उत्साह

शिवाजी विद्यापीठात अलीकडील काळात अनेक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. त्यामध्ये राष्ट्रीय कव्वाली महोत्सवापासून विद्यापीठातील वातावरण भारून जाणार आहे, तर त्यानंतर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सातारा, सांगली आणि कोल्हापूर येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सव होणार आहे, तर सांगलीमध्ये मध्यवर्ती युवा महोत्सव होणार आहे. त्यामुळे पुढील काळात विद्यापीठामध्ये परीक्षाच्या वातावरणाबरोबरच या कार्यक्रमामुळे उत्साहाचे वातावरण असणार आहे.

# विद्यापीठात आजपासून कव्वाली स्पर्धा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारतीय विद्यापीठ महासंघ (ए.आय.यु.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने तिसऱ्या राष्ट्रीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेचे आयोजन येत्या सोमवारपासून (दि. २२ ऑक्टोबर) विद्यापीठात करण्यात आले आहे. या दोनदिवसीय स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी सकाळी १०.३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवनाच्या सभागृहात ए.आय.यु.चे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हिड यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेत देशभरातील एकूण आठ संघांनी नोंदणी केली आहे. समारोप समारंभ मंगळवारी (दि. २३) सायंकाळी ४ वाजता होणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या आठ संघापैकी चार संघ महाराष्ट्रातील असून हरियाणा, पंजाब, राजस्थान व मध्यप्रदेश या राज्यांमधून प्रत्येकी एक संघ सहभागी होणार आहे.

# मास कम्युनिकेशनच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा उद्या मेळावा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागामध्ये मास कम्युनिकेशनच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा मंगळवार, दि. २३ रोजी आयोजित करण्यात आला आहे. विभागास पन्नास वर्षे पूर्ण होत असून, या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या आय. क्यू. ए. सी. चे संचालक डॉ. आर. के. कामत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम ११ ते ३ या वेळेत वृत्तपत्रविद्या विभागाजवळील मानव्यशास्त्र सभागृहामध्ये होणार आहे. याप्रसंगी विभागातील पाच माजी विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार मिळाले असून त्यांचाही सत्कार होणार आहे. मास कम्युनिकेशनच्या सर्व माजी विद्यार्थ्यांना जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी यानिमित्ताने मिळणार आहे. तरी सर्व माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.